सामाजिक वनीकरण

निवडलेल्या पाणवहाळ क्षेत्रातील वनेतर सामुहिक जमिनीवर वृक्ष लागवड योजना ( बीगर आदिवासी)

**महाराष्ट्र शासन** .

ग्राम विकास व जलसंधारण विभाग,

शासन निर्णय, क्रमांक-, एसएलएफ-1093/प्र.क्र.11/जल-11

मंत्रालय, मुंबई-400032,

दिनांक- 3 सप्टेंबर, 1993

**वाचा**:- १) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र- एमएफपी-१०८७ /प्र.क्र.८५/फ-११, दिनांक २१ ऑक्टोंबर, १९८७.

२) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. जलस-१०९२/सीआर-१८२ /जल-७, दिनांक ५ ऑगस्ट, १९९२.

३) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. एसएलएफ-१०९१/प्र.क्र.८९ /जल-११, दिनांक ३० नोव्हेंबर, १९९२.

४) संचालक, सामाजिक वनीकरण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. कक्ष- १/नवा /९८/५१५३, सन ९२-९३ दिनांक १९ जानेवारी, १९९३.

५) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. एसएलएफ-१८९३/प्र.क्र.२३ /जल-१२, दिनांक ६ फेब्रुवारी, १९९३.

**प्रस्तावना**:-

राज्यात कृषी वित्त सल्लागार संस्थेने पाहणी केल्यानुसार २८.०० लाख हेक्टर वनेत्तर सामुहिक/सार्वजनिक जमिन आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेल्या सामुहिक/सार्वजनिक पडीक जमिनीचा वृक्ष लागवडीच्या माध्यमातून विकास करुन ती उत्पादनक्षम करणे आवश्यक आहे. सामाजिक वनीकरण विभागाने गेल्या दशकात निरनिराळ्या योजनांच्या माध्यमातून २.४० लाख हेक्टर्स क्षेत्र लागवडीखाली आणले आहे. तथापी सदर काम विभागास ज्या ज्या ठिकाणी सामुहिक/सार्वजनिक जमिन उपलब्ध होईल तिथे करण्यात आले आहे. राज्य शासनाने १९९२-९३ पासून एकात्मिक पाणवहाळ क्षेत्र विकासाचे धोरण स्विकारले आहे. त्यात पाणवहाळ क्षेत्रात एकाच वेळी सामाजिक वनीकरण मृद व जलसंधारणाची कामे गरजेनुसार हाती घ्यावयाची आहेत. त्यातही सामाजिक वनीकरणाचे काम पाणवहाळ क्षेत्राच्या वरच्या बाजूस

व डोंगर उतारावर केल्याशिवाय अन्य दोन घटकांच्या कामांना बळकटी येत नाही. हे धोरण राबविण्यासाठी सविस्तर आदेश शासन निर्णय दिनांक. ५.८.१९९२ अन्वये निर्गमित केले आहे. त्यानुसार सुमारे ६००० गावांच्या लघु पाणलोट क्षेत्रात जलसंधारणाचा कार्यक्रम पहिला टप्पा म्हणुन राबविण्याचा आहे.सदर गावातील सामुहिक जमिनीवर वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घ्यावयाचा आहे. अर्थात प्रस्तुत कार्यक्रम सामाजिक वनीकरण विभागात पूर्वी राबविण्यात येणा-या गट लागवड योजनेचे व्यापक स्वरुप आहे. हा कार्यक्रम चांगला असून तो बदललेल्या परिस्थितीत सुद्धा चालू ठेवावा असा शासनाचा विचार आहे. त्याअनुषंगाने शासन पुढील प्रमाणे आदेश देत आहे:-

**<u>शासन निर्णय :-</u>**

निवडलेल्या गावांच्या लघुपाणवहाळ क्षेत्रात वनेतर सामुहिक/ सार्वजनिक जमिनीवर वृक्ष लागवड योजना राज्यात १९९३-९४ पासून कार्यान्वित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या संदर्भात योजना त्यांची अंमलबजावणी इत्यादीबाबत तपशील पुढील प्रमाणे आहे:-

**१) या योजनेचे उद्देश खालील प्रमाणे आहे:-**

अ) निवडक लघु पाणलोट क्षेत्रात जलसंधारण, जलपुनर्भरण करण्यासाठी सामुहिक/ सार्वजनिक जमिनीवर वृक्ष लागवड करणे.

ब) स्थानिक जनतेच्या इंधन, चारा व लहान इमारती लाकूड या गरजा भागविणे.

क) जमिनीची धूप थांबविणे, जल व मृद संधारण करणे, पर्यावरण संतुलन राखणे व पाणी वाहून जाण्याचे प्रमाण कमी करणे.

ड) ग्रामिण भागात रोजगाराची संधी निर्माण करणे.

**२) योजनेचा तपशिल:-**

शासन निर्णय दिनांक ५ ऑगस्ट, १९९२ च्या अनुषंगाने १९९३-९४ मध्ये निवडलेल्या लघु पाणलोट क्षेत्रातील ३००० गावात हा कार्यक्रम राबविला जाईल. त्यानुसार त्यातील उपलब्ध सामुहिक/ सार्वजनिक जमिन पुढील तीन प्रभागात विभागता येईल.

अ) प्रभाग -१:- ज्या जमिनीत मातीची खोली १० से.मी. पेक्षा कमी आहे.

ब) प्रभाग -२ :- ज्या जमिनीत मातीची खोली १० ते ३० से. मी. आहे.

क) प्रभाग -३ :- ज्या जमिनीत मातीची खोली १० ते ३० से. मी. पेक्षा अधिक आहे.

उपरोक्त तीन प्रभागात करावयाच्या कामाचा तपशील परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आला आहे.

**३) योजनेची अंमलबजावणी:-**

या योजनेअंतर्गत सामुहिक/ सार्वजनिक जमिनीवर करण्यात येणा-या वृक्ष लागवडीची देखभाल व संरक्षण ग्राम पंचायतीने व गावातील लोकांनी करावयाची आहे. त्यामुळे, विभागामार्फत रखवालदार नेमण्याची तरतुद करण्यात आलेली नाही. तसेच , वृक्ष लागवडीपासून मिळणारे सर्व उत्पन्न ग्राम पंचायतीला मिळेल व त्यांनी त्यांचा वापर गावांच्या विकास कामांसाठी करावयाचा आहे. हे लक्षात घेता योजना राबविताना त्यात लोकांचा सहभाग असणे आवश्यक आहे. या दृष्टीने सुसंबद्ध योजनेची आखणी करण्यात यावी. त्यासाठी सुटसुटीत मॅनेजमेंट प्लॅन तयार करावा. हे करताना जमिनीची तसेच वृक्ष प्रजातींची निवड ग्रामपंचायतीच्या सल्ल्याने करावी. त्याप्रमाणे ग्राम पंचायतीबरोबर शक्य तो करारनामा करावा. या योजनेअंतर्गत विभागाने तीन वर्षांनंतर प्रस्तुत लागवड ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करावयाची असल्याने वर उल्लेखलेल्या मॅनेजमेंट प्लॅन मध्ये विविध वृक्ष प्रजातीच्या तोडीपर्यन्त कार्यपद्धती आखून द्यावी म्हणजे ग्रामपंचायतीस पुढील व्यवस्थापनाबाबत कोणतीही अडचण येणार नाही या प्रयोजनासाठी मॅनेजमेंट प्लॅन तसेच वार्षिक अंदाजपत्रक व आराखड्यात प्रचलित नियमानुसार तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी सक्षम अधिका-यांनी द्यावी.

**४)** या योजनेअंतर्गत १९९३-९४ मध्ये राज्यात जलसंधारण कार्यक्रमासाठी निवडलेल्या गावातील सामुहिक/ सार्वजनिक पडिक जमिनीवरील ६३७५ हेक्टर्स क्षेत्रावर वृक्ष लागवड केली जाईल त्याचा भौतिक व आर्थिक तपशील परिशिष्ट "क" मध्ये दिला आहे. यासाठी दर हेक्टरी खर्च रुपये ६२५१/- इतका येईल. त्याचा तपशिल परिशिष्ठ " अ" मध्ये दिला आहे.

५. या योजनेचे निरीक्षण व संनियंत्रण इतर नियमित योजनाप्रमाणे जिल्हा, वृत्त संचालनालय स्तरावर करण्यात यावे.

६. <u>रेकॉर्ड व लेखे</u> :- लागवड अधिका-यांनी तालुका स्तरावर, उपसंचालक, सामाजिक वनीकरण यांनी जिल्हा स्तरावर या योजनेचे रेकॉर्ड व लेखे विहीत पद्धतीनुसार स्वतंत्ररित्या ठेवावे.

७. <u>लेखापरिक्षा</u> :-या योजनेचे रेकॉर्ड संबंधित अधिका-यांनी नियमित लेखा परिक्षेसाठी उपलब्ध करुन द्यावे.

८. <u>योजनेसाठी आर्थिक तरतूद</u> :- शासन परिपत्रक वित्त विभाग, क्रमांक-पुरक १०९३ /प्र.क्र १९८/ अर्थसंकल्प-३, दिनांक ३१ जुलै, १९९३ अन्वये महाराष्ट्र ( व्दितीय पुरवणी) विनियोजन

अधिनियम १९९३ ( सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र-२३) अन्वये पुरवणी मागण्या अर्थसंकल्पिय तरतुदीच्या वितरणासाठी पारित झाला आहे. हे लक्षात घेता या शासन निर्णयाव्दारे बिगर आदीवासी क्षेत्रात निवडलेल्या पाणवहाळ क्षेत्रातील सामुहिक/सार्वजनिक जमिनीवर वृक्ष लागवड या प्रयोजनासाठी १९९३-९४ करिता संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य , पुणे यांना रु ३७२.७७ लाख (रुपये तिनशे बहात्तर लाख सत्त्याहत्तर हजार मात्र ) इतक्या मर्यादेपर्यंत खर्च करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानी त्यांचे जिल्हावार वाटप करुन त्याबाबत शासनास कळवावे.

९. या प्रयोजनासाठी होणारा खर्च मागणी क्र-एल-२३, ४४०६ वनीकरण व वन्य जीवन यावरील भांडवली खर्च , १०२ सामाजिक व क्षेत्र वनीकरण , पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना-राज्य योजनेअंतर्गत योजना, (चार) पाणवहाळ क्षेत्रातील सार्वजनिक / सामुहिक जमिनीवर वृक्ष लागवड ( ४४०६ ०६७२) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून १९९३-९४ च्या वर्षाखाली मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

१०. निवडलेल्या पाणवहाळ क्षेत्रातील सामुहिक/ सार्वजनिक जमिनीवर वृक्ष लागवडीसाठी वनजाती क्षेत्र उपयोजना याकरिमता रु २५.७५ (रुपये पंचवीस लाख पंच्च्याहत्तर मात्र) शासन निर्णय ,आदीवासी विभाग , क्र टी एस पी १०९३/ बीयुडी ९८/ का-७, दिनांक ३१ जुलै, १९९३ अन्वये करण्यात आली आहे. हे लक्षात घेता या तरतुदींचा वापर योजनेसाठी वर विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात यावा. त्यानुसार संचालक , सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य , पुणे यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**स्वाक्षरीत/-**

( र. द. मांडे )
कक्ष अधिकारी
ग्रामविकास व जलासंधारण विभाग

प्रति,

1. संचालक , सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य , पुणे,
2. सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते(५),

3. सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग (२९),
4. महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई, नागपुर,
5. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/ नागपुर
6. सर्व जिल्हाधिकारी,
7. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषदा,
8. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
9. विभागीय आयुक्त, महसुली विभाग (सर्व),
10. कार्यासन अधिकारी, जल १ ते २३,
11. कार्यासन अधिकारी,  ग्रामविकास व जलासंधारण विभाग, १९ व ३४,
12. कार्यासन अधिकारी,  वित्त विभाग, व्यय-१५, अर्थसंकल्प ३ व ४
13. कार्यासन अधिकारी,  नियोजन विभाग, योजना-१४,
14. कार्यासन अधिकारी,  आदीवासी विभाग कार्यासन-१४,
15. निवड नस्ती, जल-११.